# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

## बुधवार दिनांक १६ जानेवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीचे इतिवृत्त

**उक्त बैठकीमध्ये खालील अधिकारी उपस्थित होते.**

१) **मा. श्री संजयकुमार , भाप्रसे,**
अपर मुख्य सचिव,
गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई तथा अध्यक्ष, कार्यकारी समीती,

२) **मा. श्री संजयकुमार, भाप्रसे,**
अपर मुख्य सचिव,
गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समीती,

३) **मा. श्री नितीन करीर, भाप्रसे,**
प्रधान सचिव, नगर विकास विभाग–१,
मंत्रालय, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समीती,

४) **मा. अपर मुख्य सचिव,**
वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई तथा सदस्य कार्यकारी समिती
तर्फे श्री यशवंत बुधवंत, कक्ष अधिकारी
मंत्रालय, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.

५) **मा. श्रीमती शीतल तेली–उगले, भाप्रसे,**
महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तथा सदस्य, कार्यकारी समिती.

६) **श्री सुधाकर कुळमेथे,**
अपर जिल्हाधिकारी,
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर

७) **श्री हेमंत ठाकरे**
मुख्य लेखा व वित्त अधिकारी, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, (सदस्य) कार्यकारी समिती

**ठराव क्र. १/०५/१६.०१.२०१९**

विषय :– **गुरूवार दिनांक ०६ डिसेंबर २०१८ रोजी संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या चौथ्या बैठकीतील निर्णय, इतिवृत्त व अनुपालन अहवाल माहिती व अनुमोदनाकरिता ठेवण्याबाबत.**

**ठराव :– महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ नियम क्र. ४ अन्वये महानगर प्राधिकरणाची रचना करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील नियम क्र. ७ प्रमाणे महानगर प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ०६ डिसेंबर २०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयांचे इतिवृत्त तथा अनुपालन अहवाल मंजूर करण्यात आला.**

ठराव क्र. २/०५/१६.०१.२०१९

**विषय :—** **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांना भत्ते) प्रारूप विनियम, २०१८ कार्यकारी समितीची मान्यतेकरीता पाठविण्याबाबत.**

महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम—२०१६ च्या कलम ४८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने खालील विनियम तयार केल आहे.

१. **संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ :**

या विनियमांना नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांना भत्ते) विनियम , २०१८ असे म्हणण्यात येईल.

हे विनियम त्वरीत अंमलात येतील.

संदर्भानूसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर

२. **या विनियमाखाली**

अ) ''अधिनियम'' याचा अर्थमहाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३) असा आहे.

आ) ''अधिसूचना'' याचा अर्थ नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांनी दि. ०४.०३.२०१७ ची निर्गमित केलेली अधिसूचना असा आहे.

इ) ''प्राधिकरण'' याचा अर्थ या दि. ०४.०३.२०१७ च्या अधिसूचनेने गठीत केले प्रमाणे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण असा आहे.

ई) कार्यालयीन सदस्य म्हणजे मंत्री राज्य मंत्री किंवा राज्य शासनकेंद्र शासन किंवा स्थानिक प्राधिकरण किंवा शासकिय कंपनी किंवा शासकिय उपक्रमाचे सेवक किंवा शासकिय उपक्रम जे अंमलात असलेल्या विद्यमान कायदया नूसार स्थापित झालेले आहे. अशा संस्थाचा' सेवक'

उ) अशासकिय सदस्य म्हणजे सदस्य जो शासकिय सदस्य नाही.

ऊ) 'कार्यात्मक मंडळ' याचा अर्थ अधिनियमच्या कलम ९ अन्वये गठीत करण्यात आलेल्या कार्यात्मक मंडळा पैकी एक किंवा अनेक मंडळे; असा आहे.

ए) स्वीकारने म्हणजे प्राधिकरणा कडून रक्कम घेणे

३. प्रत्येक अशासकीय सदस्य जो प्राधिकरणाचा / कार्यकारी समितीच्या / कार्यात्मक मंडळ अथवा प्राधिकरणा बाबतच्या अध्यादेशातील तरतूदी नूसार स्थापन झालेल्या अन्य अशा समितीच्या बैठकीस उपस्थित राहातील त्याकरीता रक्कम स्वीकारेल.

४. प्रत्येक शासकीय सदस्य आणि विशेष किंवा कायमस्वरूपी आंमत्रित प्राधिकरणाच्या सभेस/ कार्यकारी समीतीच्या अथवा प्राधिकरणाबाबतच्या अध्यादेशातील तरतूदीनूसार स्थापन झालेल्या अन्य अशा समितीच्या बैठकीस उपस्थित राहातील, ते ज्या संस्थेमध्ये सेवेत असतील त्यासंस्थेच्या नियमाप्रमाणे प्रवास भत्ता व दैनिक भत्ता मिळणेस पात्र राहतील.

५. प्राधिकरणाच्या अशासकीय सदस्यांना नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यकारी समीती / प्राधिकरणाच्या अधिनियमच्या तरतूदीनूसार वा अन्य कारणास्तव स्थापन झालेल्या अन्य अशा समीतीच्या बैठकीस उपस्थित राहाण्याबद्दल बैठक शुल्क म्हणून प्रतिदिन रू. ५०० बैठक भत्ता अनूज्ञेय राहील. त्याच प्रमाणे वित्त विभाग शासन निर्णय क्र.शा.स.ऊ. १०.१०./प्र.क्र.९६/१० स.उ. दि. १३ मार्च २०१२ मध्ये नमूद केल्या प्रमाणे प्रवास भत्ता अनूज्ञेय राहील. बैठक भत्या मध्ये तसेच प्रवास भत्त्याचे तरतूदीबाबत आवश्यकते नूसार विशेष ठरावाद्वारे प्राधिकरणबदल करू शकेल.

६. विषयांकित प्रकरणी ( प्रवास भत्ता अथवा बैठक भत्ता इ. बाबत) वित्त विभाग वेळोवेळी जे शासन निर्णय निर्गमीत करेल ते तसेच यापूढे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा च्या सर्वसमितीच्या बैठकीकरिता लागू राहातील.

महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण चे कलम ४८ अन्वये महानगर प्राधिकरणास, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने वेगवेगळे विनिमय तयार करण्याचे अधिकार असून त्या अन्वये महानगर प्राधिकरणाच्या दिनांक २०/८/२०१८ च्या बैठकीत सदर विषय ठेवला असता, प्राधिकरणाचे कार्यकारी समितीच्या मंजूरीने राज्य शासनाची पूर्व मान्यता घेण्याचे निर्देश दिले असून त्या प्रमाणे विषय कार्यकारी समिती समक्ष राज्य शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्याकरिता सादर. राज्य शासनाची मंजूरी झाल्यास विषय प्राधिकरणाचे मंजूरी करिता सादर करण्यात येईल.

ठराव : **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांची भत्ते) प्रारूप विनियम, २०१८ ला मान्यता देऊन, शासनाचे पुर्वमान्यतेस पाठविण्यापुर्वी विनियमाचे प्रारूप प्राधिकरणा समक्ष ठेवावे या अटीवर मंजूरी प्रदान केली.**

ठराव क्रमांक : ३/०५/१६.०१.२०१९

विषय : केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने (National Lake Conservation Plan) अंतर्गत कोराडी तलाव संवर्धन कामाच्या निविदा स्विकृतीबाबत.

मा. मंत्री (उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा) तथा पालकमंत्री, नागपूर जिल्हा यांचे दिनांक २०.०२.२०१५ च्या पत्रान्चये केंद्र शासनाने राष्ट्रीय सरोवर योजने (National Lake Conservation Plan) अंतर्गत कोराडी तलाव संवर्धन प्रकल्प राबविण्याकरीता प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. याअनुषंगाने कोराडी तलाव संवर्धन कामाचा विस्तृत प्रकल्प अहवाल पर्यावरण वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांना सादर करण्यात आला व पर्यावरण वन एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार यांनी सदर कामास National Plan for Conservation of Eco System या प्रकल्पा अंतर्गत दिनांक ०१.०३.२०१८ चे पत्रान्वये रू. ४३.६९ कोटीच्या कामास मंजूरी प्रदान केलेली आहे.

सदर कामाचे प्रशासकीय मान्यते नुसार या कामाचा खर्च ६०:४० या प्रमाणात भारत सरकार व महानिर्मीती कंपनी करणार आहे. या नुसार या कामाकरीता रू. २६.२१ कोटी (६० टक्के) व महानिर्मीती कंपनी कडून रू. १७.४८ कोटी (४० टक्के) प्राप्त होणार आहे. प्रशासकीय मान्यतेमध्ये नमुद केल्यानुसार सदर कामाकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास प्रकल्प कार्यन्वयीन यंत्रणा म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे. सदर तलाव महानिर्मीती कंपनीच्या मालकीचा असल्यामुळे प्रकल्प राबविण्या करीता महानिर्मीती कंपनी व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी दिनांक १६.०१.२०१८ रोजी सांमजस्य करार करण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्प करीता महानिर्मीती कंपनी यांनी रू. ३.४९६ कोटी (केंद्र सरकारकडून प्राप्त निधीच्या ४० टक्के) नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास जमा केलेला आहे. तसेच, केंद्र शासनाने दिनांक ०९.०३.२०१८ च्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनास (महानिर्मीती कंपनीस) रू. ८.७४ कोटी उपलब्ध करून दिलेले आहेत.

कोराडी तलाव संवर्धन प्रकल्पाच्या रू. ३५,३६,४३,३७७/— च्या अंदाजपत्रकास अधिक्षक अभियंता (प्रकल्प), नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांनी क्र. १४५/Conservation of Koradi Lake/2018-19 दिनांक २४.०९.२०१८ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे व तांत्रिक मान्यता व उर्वरीत कामाचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| Conservation of Koradi Lake' in Nagpur, Maharashtra under NPCA | | | | |
|---|---|---|---|---|
| SUMMARY SHEET | | | | |
| Sr. No. | Item | Unit | Rate | Cost |
| अ) निविदेतील कामे | | | | |
| 1 | Sewage Treatment Plant- 6 Unit including sewer line | 1 | 196,643,349.00 | 196,643,349.00 |
| 2 | Construction of Visarjan Kunda | 1 | 44,694,420.00 | 44,694,420.00 |
| 3 | Landscaping | 1 | 5,152,128.00 | 5,152,128.00 |
| 4 | Construction of office | 1 | 3,915,333.00 | 3,915,333.00 |
| 5 | Construction of Public Toilet | 1 | 3,388,084.00 | 3,388,084.00 |
| 6 | Compound wall / Fencing to lake | 1 | 3,368,000.00 | 3,368,000.00 |
| 7 | Vermicomposting Plant | 1 | 6,623,337.00 | 6,623,337.00 |
| 8 | Afforestation | 1 | 9,806,511.00 | 9,806,511.00 |
| 9 | Deweeding | 1 | 18,876,704.00 | 18,876,704.00 |
| | Sub Total | | | **292,467,866.00** |
| | Add Royalty charges | 1 | 2,528,838.00 | 2,528,838.00 |
| | | | | **294,996,704.00** |
| | Add 12% GST | | | 35,047,337.00 |
| | Centage charges @ 8% | | | 23,599,736.00 |
| | | | Total A | **353,643,777.00** |
| ब) उर्वरीत कामे | | | | |
| | Add electrification | 8% | | 23,364,891.60 |
| | Consultancy charges for NEERI for plantation & landcsaping | | | |
| | 21,581,976.00 | 10% | | 2,158,197.60 |
| | Fountains 37.35 lacs | | | 3,735,000.00 |
| | Development of fisheries | | | 26,352,000.00 |
| | Public awareness & participation | | | 10,700,000.00 |
| | | | | **396,435,474.00** |
| | | Add 2% contingencies | | 7,167,424.68 |
| | | | | **403,611,684.00** |
| | | Centage charges | | 32,365,000.00 |
| | | | TOTAL B | **8,23,32,907.00** |

सदर कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय दिनांक १२.०४.२०१७ नुसार कामाच्या ई–निविदा www-mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे प्रसिध्द करण्यात आल्या. याबद्दलतपशिल खालील प्रमाणे आहे.

| निविदा क्र. | निविदा रक्कम | नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण निविदा क्र. व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1st Call | २९,४९,९६,७०४/— | १९/२०१८—१९ दिनांक २९.०९.२०१८ | सदर कामाकरीता निविदा प्राप्त न झाल्याने फेरनिविदा करण्यात आली. |
| 2nd Call | २९,४९,९६,७०४/— | २३/२०१८—१९ दिनांक ०६.११.२०१८ | सदर कामाकरीता फक्त एक निविदा प्राप्त झाल्याने फेरनिविदा करण्यात आली. |
| 3rd Call | २९,४९,९६,७०४/— | २५/२०१८—१९ दिनांक ०७.१२.२०१८ | सदर कामा करीता सहा निविदा प्राप्त झाल्या. |

सदर कामाच्या तिसऱ्या वेळच्या ई—निविदा नवभारत, हितवाद, टाईम्स ऑफ इंडीया, सकाळ, देशोन्ती या वृत्तपत्रात व www-mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दिनांक ०७.१२.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या. निविदेचा तपशील सोबत जोडण्यात आलेला आहे.

या कामाच्या निविदा सुचना क्र. ०२५/२०१८—१९ मध्ये सहा निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदाचा लिफाफा—१ (तांत्रिक) दिनांक २७.१२.२०१८ रोजी संकेत स्थळावरून डॉउनलोड करण्यात आल्या. प्राप्त निविदेची तांत्रिक दस्ताऐवजाची छाननी अंती खालील प्रमाणे सर्व कंत्राटदाराच्या निविदा तांत्रिक तपासणी मध्ये पात्र ठरल्या.

१. मे. विजय कंन्स्ट्रक्शन, नागपूर
२. मे. बी. सी. बियानी प्रोजेक्ट प्रा. लि.
३. मे. डी. पी. जैन ॲन्ड इन्फ्रा. प्रा. लि.
४. मे. अभि इंजिनिअरींग व ओझोन (JV)
५. मे. सुपर कंन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर
६. मे. दृष्टी स्ट्रक्चरल इंजिनिअरींग प्रा. लि.

दिनांक २९.१२.२०१८ रोजी वरील सहा कंत्राटदारांनी सादर केलेला लिफाफा—२ (फायनांशिअल बिड) डाउनलोड करण्यात आला. निविदा धारकांनी सादर केलेल्या निविदेची एकूण रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अ क्र. | कंपनी | प्राप्त निविदेची एकूण रक्कम रू. | अधिक्य/कमी (टक्केवारी ) |
|---|---|---|---|
| १. | मे. विजय कंन्स्ट्रक्शन, नागपूर | २६,६९,५०,२२७.३७ (L-1) | ९.५०७ टक्के कमी दराने |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | मे. बी. सी. बियानी प्रोजेक्ट प्रा. लि. | २९,२०,७७,९४९.८०(L-2) | ०.९८ टक्के कमी दराने |
| ३. | मे. डी. पी. जैन ॲन्ड इन्फ्रा. प्रा. लि. | २९,२१,६६,२७१.६८(L-3) | ०.९५ टक्के कमी दराने |
| ४. | मे. अभि इंजिनिअरींग व ओझोन (JV) | २९,३४,२४,२२२.१२(L-4) | ०.५३ टक्के कमी दराने |
| ५. | मे. सुपर कंन्स्ट्रक्शन कंपनी, नागपू | ३३,२९,९२,८९५.४०(L-5) | १२.८८ टक्के अधीक दराने |
| ६. | मे. दृष्टी स्ट्रक्चरल इंजिनिअरींग प्रा. लि. | ३३,९०,६९,२११.१०(L-6) | १४.९४ टक्के अधीक दराने |

वरील विवरणानुसार मे. विजय कंन्स्ट्रक्शन, नागपूर यांनी सादर केलेली निविदा रक्कम रू **२६,६९,५०,२२७.३७** (९.५०७ टक्के कमी दराने) असून हा निम्नतम देकार आहे. कंत्राटदाराचा देकार निविदा रक्कमेच्या १० टक्के पेक्षा कमी दराचा असल्याने निविदेच्या अटी व शर्ती नुसार निविदा रक्कमेवर रू. २९,५०,०००/— (१.०० टक्के) किंमतीची बॅंक ऑफ इंडिया, नागपूर मुदत ठेव परफारमंस सिक्युरीटी म्हणुन निविदाधारकाने सादर केलेली आहे.

सदर प्राप्त निविदेची रक्कम रू. **२६,६९,५०,२२७.३७** आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र जानेवारी २०१७ च्या अधिनियमातील कलम ४३ व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण दिनांक २६.०३. २०१८ च्या दुसरी सभा ठराव क्र. १३/०२ दिनांक २६.०३.२०१८ नुसार निविदा स्विकृती बाबतचे अंतिम अधिकार कार्यकारी समितीस आहे.

सदर प्राप्त निविदेची रक्कम रू. **२६,६९,५०,२२७.३७** आहे. तरी,निम्नतम निविदा मंजूरीस सादर.

ठराव : **मे. विजय कंन्स्ट्रक्शन यांची केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजने (National Lake Conservation Plan) अंतर्गत कोराडी तलाव संवर्धन या कामाची रू. २६,६९,५०,२२७.३७ किंमतीची निम्नतम प्राप्त निविदेतील दर हे ९.५०७ टक्के कमी असल्यामुळे सदर दराबाबत दरपृथ:करण तांत्रिकरित्या अचूक असल्याबाबत अधीक्षक अभियंता यांनी प्रमाणित करण्याच्या अटीवर मंजूरी प्रदान केली.**

**ठराव क्रमांक : ४/०५/१६.०१.२०१९**

विषय : श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी त. कामठी, जि. नागपूर या तिर्थस्थळ येथील राम मंदीर, हनुमान मंदिर सभागृह, महाव्दार, फुड कोर्ट, इंडोर गेम हाउसच्या (विद्युतीकरण व अग्निशामक सहित) या कामाच्या निविदा स्विकृतीबाबत.

शासन निर्णय क्र. तीक्षेवी--२०१५/प्र.क्र.१६/१४४४ दिनांक २५.०५.२०१५ अन्वये श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी त. कामठी, जि. नागपूर या तिर्थस्थळाचा विकास करण्याकरीता नागपूर सुधार प्रन्यासला नोडल ऐजन्सी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

श्री. महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी (ता. कामठी, जिल्हा नागपूर) या तिर्थस्थळाचा विकास करण्याकरीता शासन निर्णय क्र. नासुप्र—२०१५/युओआर— ५८/ प्र.क्र. ११४/नवि—२६ दिनांक २१.१२.२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली होती व शासन निर्णय दिनांक ३०.१०.२०१७ नुसार एकूण रू. १६४.३८ कोटी च्या आराखडयास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. यानंतर शासन निर्णय क्र. नासुप्र—२०१७/प्र. क्र. ९६/नवि—२६ दिनांक २३.१०.२०१७ व शुध्दीपत्रक दिनांक २६.१०.२०१७ एकूण रू २४.७५ कोटी अन्वये नविन अतिरीक्त कामे मंजूर करण्यात आलेली आहे. या दोन्ही प्रशासकीय मान्यतेनुसार यात समाविष्ट कामे प्रगतीत आहे.

शासन निर्णय क्र. नासुप्र—२०१७/प्र.क्र. ९६/नवि—२६ दिनांक १०.१०.२०१८ अन्वये महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी ता. कामठी जि. नागपूर या तीर्थस्थळाच्या मूळ विकास आराखडयात नव्याने महाव्दार, रामंदीर सभागृह, हनुमान मंदीर सभागृह, राष्ट्रीय महामार्गा पासून जोड मार्ग, फुड कोर्ट व इंडोर गेम हाउस इ. कामांचा समावेश करून रू. ३१.६८ कोटीला प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

वरील प्रमाणे श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी या ब वर्ग तिर्थक्षेत्र/पर्यटन स्थळाचा विकास करण्यासाठी एकूण रू. २२०.८१ कोटी एवढी प्रशासकीय मान्यता शासनातर्फे टप्प्या टप्प्याने प्राप्त झालेली आहे व प्राप्त प्रशासकीय मान्यतेचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | शासन निर्णय | प्रशासकीय मान्यतेची किंमत रू. कोटी | समाविष्ट कामे | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | शासन निर्णय क्र. नासुप्र—२०१५/युओआर— ५८/ प्र.क्र. ११४/नवि—२६ दिनांक २१.१२.२०१५ व सुधारीत शासन निर्णय दिनांक ३०.१०.२०१७ | १६४.३८ | १. भक्त निवास, २. संरक्षण भिंत, ३. टुरिस्ट रिसेंप्शन सेंटर, ४. शॉपिंग कॉम्प्लेक्स, ५. पुजारी निवास, ६. बस स्टॉप व ७. वाहनतळाचे ८. एमईपी वक, ९. पेव्हींगची कामे, | कामे प्रगतीत |
| २ | शासन निर्णय क्र. नासुप्र—२०१७/प्र.क्र. ९६/नवि—२६ दिनांक २३.१०. | २४.७५ | नव्याने समाविष्ट करण्यात आलेली कामे, १) सभागृह, २) नविन आवार भिंत व ३) कुकींग शेड बांधकाम. | कामे प्रगतीत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २०१७ व शुध्दीपत्रक दिनांक २६.१०.२०१७ | | | |
| ३ | शासन निर्णय क्र. नासुप्र–२०१७/प्र.क्र. ९६/नवि–२६ दिनांक १०.१०. २०१८ | ३१.६८ | नव्यानी पुन्हा समाविष्ट केलेली बांधकामे<br>१) महाव्दार बांधकाम,<br>२) सभागृह बांधकाम राम मंदीर,<br>३) सभागृह बांधकाम हनुमान मंदीर,<br>४) उपहारगृह बांधकाम,<br>५) इनडोअर गेम गृह मुलं मुलींकरीता,<br>६) नागपूर सावनेर रस्त्यापासून कोराडी महालक्ष्मी मंदीर पोचमार्ग बांधकाम | १) राम मंदीर व हनुमान मंदिर सभागृह, महाव्दार, फुड कोर्ट, इंडोर गेम हाउसच्या (विद्युतीकरण व अग्निशामक सहित) या कामाच्या निविदा दिनांक १६.०१. २०१९ ला अध्यक्ष, कार्यकारी समिती यांच्या संमतीने मंजूर. कंत्राट राशी रू. १८.[illegible] कोटी 18.65<br>२) नागपूर सावनेर रस्त्यापासून कोराडी महालक्ष्मी मंदीर पोचमार्ग बांधकाम निविदा निश्चित.<br>कंत्राट राशी रू. ३.८४ कोटी |
| | एकूण रू. | २२०.८१ | | |

सदर कामाच्या प्रशासकीय मान्यतेनुसार महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी ता. कामठी जि. नागपूर या तीर्थस्थळाच्या विकास कामासाठी लागणारा ८० टक्के (१७६.६४ कोटी) निधीचा वाटा हा शासनामार्फत व २० टक्के (४४.१६ कोटी) वाटा हा नागपूर सुधार प्रन्यास मार्फत प्राप्त होणार आहे व शासनातर्फे आता पर्यंत रू. १२६.१० कोटी निधी उपलब्ध करून दिलेला आहे.

दिनांक १०.१०.२०१८ चे प्रशासकीय मान्यतेनुसार श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी त. कामठी, जि. नागपूर या तिर्थस्थळ येथील राम मंदीर, हनुमान मंदिर सभागृह, महाव्दार, फुड कोर्ट, इंडोर गेम हाउसच्या (विद्युतीकरण व व अग्निशामक सहित) या कामाच्या रू. २५,५५,०७,४१०/– च्या अंदाजपत्रकास अधिक्षक अभियंता (प्रकल्प), नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांनी क्र. २१९/Govt. Grant (Koradi) /E.E-P1/2018-19 दिनांक १३.१२. २०१८ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर कामाच्या रू. २२,१२,२२,१००/– निविदा बी–२ नमुन्यात सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय दिनांक २७.०९.२०१८ नुसार दिनांक ०४.१२.२०१८ रोजी मागविण्यात आली. (निविदा सुचना क्र.२४/२०१८–१९). सदर निविदा www-mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली. तसेच, नवराष्ट्र, टाईम्स ऑफ इंडीया,

पुन्य नगरी, लोकमत समाचार या वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे प्रसिध्द करण्यात आली होती. या कामा (निविदा सुचना क्र. २४/२०१८–१९) मध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त निविदाचा लिफाफा–१ (तांत्रिक) दिनांक ०३.०१.२०१९ रोजी संकेत स्थळावरून डॉउनलोड करण्यात आला व निविदेचे तांत्रिक दस्ताऐवजाची छाननी अंती खालील कंत्राटदाराच्या तीन निविदा तांत्रिक तपासणी मध्ये पात्र ठरल्या.

१. मे. एस. एस. पाटील ॲन्ड कंपनी (JV)
२. मे. विजय कंन्स्ट्रक्शन, नागपूर
३. मे. राम इन्फ्रा प्रोजेक्ट (JV)

दिनांक ०५.०१.२०१९ रोजी वरील तीन कंत्राटदारांनी सादर केलेला लिफाफा–२ (फायनांशिअल बिड) डाउनलोड करण्यात आला. निविदा धारकांनी सादर केलेल्या निविदेची एकूण रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंपनी | प्राप्त निविदेची एकूण रक्कम रू. | अधिक्य/कमी (टक्केवारी) |
|---|---|---|---|
| १. | मे. एस. एस. पाटील ॲन्ड कंपनी (JV) | १८,६५,७८,७१८.७२ (L-1) | १५.६६ टक्के कमी दराने |
| २. | मे. विजय कंन्स्ट्रक्शन, नागपूर | १८,७५,३९,६२९.०१(L-2) | १५.२२ टक्के कमी दराने |
| ३. | मे. राम इन्फ्रा प्रोजेक्ट (JV) | १९२०६१६०५.१०(L-3) | १३.१८ टक्के कमी दराने |

वरील विवरणानुसार मे. एस. एस. पाटील ॲन्ड कंपनी (JV), नागपूर यांनी सादर केलेली निविदा रक्कम रू १८,६५,७८,७१८.७२ (१५.६६ टक्के कमी दराने) निम्नतम देकार आहे. हा देकार १५.६६ टक्के कमी दराचा असल्याने निविदा धारकाने निविदेच्या अटी व शर्ती नुसार निविदा रक्कमेवर रू. १,६१,९३,५००.०० (आवश्यक ७.३२ टक्के) किंमतीची मुदत ठेव, अतिरीक्त परफारमंस सिक्युरीटी म्हणुन निविदाधारकाने सादर केलेली आहे.

सदर प्राप्त निविदेची रक्कम रू. १८,६५,७८,७१८.७२ आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र जानेवारी २०१७ च्या अधिनियमातील कलम ४३ व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण दिनांक २६.०३.२०१८ च्या दुसरी सभा ठराव क्र. १३/०२ दिनांक २६.०३.२०१८ नुसार निविदा स्विकृती बाबतचे अंतिम अधिकार अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना आहे.

सदर प्राप्त निविदेची रक्कम रू. १८,६५,७८,७१८.७२ आहे. तरी,निम्नतम निविदा मंजूरीस सादर.

ठराव : **मे. एस. एस. पाटील ॲन्ड कंपनी (JV), यांची श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान, कोराडी त. कामठी, जि. नागपूर या तिर्थस्थळ येथील राम मंदीर, हनुमान मंदिर सभागृह, महाव्दार, फुड कोर्ट, इंडोर गेम हाउसच्या (विद्युतीकरण व व अग्निशामक सहित) या कामाची रू. १८,६५,७८,७१८.७२ किंमतीची निम्नतम प्राप्त निविदेतील हे दर १५.६६ टक्के कमी असल्याने सदर दराबाबत दरपृथःकरण तांत्रिकरित्या अचूक असल्याबाबत अधीक्षक अभियंता यांनी प्रमाणित करण्याच्या अटीवर मंजूरी प्रदान केली.**

**ठराव क्रमांक. : ५/०५/१६.०१.२०१९**

**विषय :— नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामधील शासनाने मंजूर केलेल्या सुधार योजना—२ येथील सुमठाणा गावाजवळील मिहान सिमेपासून आऊटर रिंगरोड पर्यंतच्या उत्तर—दक्षिण २४.० मी. रूंद क्रॉंकीट रस्ताच्या कामाची निविदा स्विकृतीबाबत.**

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामधील शासनाने मंजूर केलेल्या सुधार योजना—२ येथील सुमठाणा गावाजवळील मिहान सिमेपासून आऊटर रिंगरोड पर्यंतच्या उत्तर—दक्षिण २४.०मी. रूंद क्रॉंकीट रस्ता बनविण्याबाबत मा. मुख्यमंत्री, श्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र राज्य यांनी दि. २९/१०/२०१८ ला झालेल्या दूरचित्रवाणी संवाद (Video Conferencing) द्वारा या रस्त्यासाठी लागणारी जागा मिहानद्वारा भूसंपादित करून नामप्रविप्रा द्वारा क्रॉंकीट रस्ता बनविण्याचे आदेशित केले आहे.

सदर कामाबाबत दि. २/११/२०१८ ला ई—निविदा www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर व लोकमत समाचार, लोकसत्ता व हितवाद या वृत्तपत्रात जाहिरातीव्दारे प्रसिध्द करण्यात आली. या कामाच्या अंदाज पत्रकास अधिक्षक अभियंता, नामप्रविप्रा यांनी क्रमांक १८०/ Road and Bridges fund 2018-19 दिनांक १२/११/२०१८ ला तांत्रीक मान्यता प्रदान केली व कार्यकारी समितीच्या बैठकीत कार्यकारी समितीने ठराव क्र. १५/०३/१५.११.२०१८ अन्वये रू. २८.३० कोटीच्या प्राक्कलन राशीला पूर्वलक्षी प्रभावाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

दिनांक २/११/२०१८ ला प्रकाशीत जाहिराती नुसार निविदा राशी रू. २२,४२,४३,३००/— च्या कामासाठी Prebid Meeting दिनांक १४/११/२०१८ ला ठेवून दिनांक ३०/११/२०१८ पर्यन्त निविदा स्विकृत करून दिनांक ३/१२/२०१८ रोजी निविदा उघडण्याचे ठरविले. परंतू Prebid Meeting मध्ये मे. द्रिष्टी स्ट्रक्चरल इंजिनियरींग प्रा.लि. आणि मे. पी.बी.ए. इन्फ्रास्ट्रक्चर्स लि. यांनी केलेल्या विनंती नुसार Prebid Meeting दिनांक २६/११/२०१८ ला व निविदा स्विकृती दिनांक ७/१२/२०१८ ला ठेवून निविदा दिनांक १०/१२/२०१८ रोजी उघडण्याचे ठरविण्यात आले.

सदर कामाबाबत खाली दर्शविलेल्या एकूण ५ कंत्राटदारांकडून संकेत स्थळावर निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांच्या लिफापा—१ (तांत्रिक) दिनांक १०/१२/२०१८ रोजी संकेत स्थळावरून डाउनलोड करून छाननी करण्यात आली. त्यानुसार खालील कंत्राटदाराच्या निविदा तांत्रीक तपासणीमध्ये पात्र ठरल्या.

१. मे. आदित्य कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर
२. मे. अभि इंजिनियरींग कार्पो. प्रा.लि.
३. मे. ॲरकॉन्स एन्फ्रास्ट्रक्चर ॲन्ड कन्स्ट्रक्शन प्रा.लि.

४. मे. द्रिष्टी स्ट्रक्चरल इंजिनियरींग प्रा.लि.

५. मे. लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग सर्विसेस प्रा.लि.

दिनांक १४/०१/२०१९ ला वरील पाचही कंत्राटदाराने सादर केलेला लिफापा—२ (फायनांशीयल) डाउनलोड करण्यात येवून उघडण्यात आल्या. निविदाधारकांनी सादर केलेल्या निविदेची एकूण रक्कम खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | रक्कम | टक्केवारी | बिड क्रमवारी |
|---|---|---|---|---|
| १ | मे आदित्य कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर | १८,३३,६३,७४७.०० | १८.२३ कमी दराने | एल—१ |
| २ | मे अभि इंजिनियरींग कार्पो. प्रा.लि. | १९,२९,२६,२६६.०५ | १३.९६ कमी दराने | एल—२ |
| ३ | मे ॲरकॉन्स एन्फ्रास्ट्रक्चर ॲन्ड कन्स्ट्रक्शन प्रा.लि. | २०,६३,०३,८३६.०१ | ८.०० कमी दराने | एल—३ |
| ४ | मे द्रिष्टी स्ट्रक्चरल इंजिनियरींग प्रा.लि. | २१,७०,१४,७४१.५० | ३.२२ कमी दराने | एल—४ |
| ५ | मे लक्ष्मी सिव्हील इंजिनियरींग सर्विसेस प्रा. लि. | २३,५०,१४,९४४.०० | ४.८० अधिक दराने | एल—५ |

वरील पाचही कंत्राटदारापैकी मे. आदित्य कन्स्ट्रक्शन कंपनी, नागपूर यांनी रू. १८,३३,६३,७४७.०० (१८.२३ टक्के कमी दराने) सर्वात कमी दराची निविदा रक्कम सादर केली.

सदर प्राप्त निविदेची रक्कम रू. १८,३३,६३,७४७.०० आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र जानेवारी २०१७ च्या अधिनियमातील कलम ४३ व नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण दिनांक २६.०३.२०१८ च्या दुसरी सभा ठराव क्र. १३/०२ दिनांक २६.०३.२०१८ नुसार निविदा स्विकृती बाबतचे अंतिम अधिकार अध्यक्ष, कार्यकारी समिती यांना आहे.

सदर प्राप्त निम्मतम निविदेची रक्कम रू. १८,३३,६३,७४७.०० मंजूरीस सादर.

ठराव :— **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामधील शासनाने मंजूर केलेल्या सुधार योजना—२ येथील सुमठाणा गावाजवळील मिहान सिमेपासून आऊटर रिंगरोड पर्यंतच्या उत्तर—दक्षिण २४.० मी. रूंद क्राँकीट रस्ताच्या कामाची रू. १८,३३,६३,७४७.०० किंमतीची निम्मतम प्राप्त निविदेतील दर हे १८.२३ टक्के कमी असल्यामुळे सदर दराबाबत दरपृथ:करण तांत्रिकरित्या अचूक असल्याबाबत अधीक्षक अभियंता यांनी प्रमाणित करण्याच्या अटीवर मंजूरी प्रदान केली.**